<u>मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, ५९ वे न्यायालय, कुर्ला, मुंबई यांचे न्यायालयात</u>

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.** 586/PS/2025

**निशाणी क्र.** 2

**१. गुन्हा घडल्याची तारीख** :- 07/10/2024

**२. गुन्ह्याचे वेळ व ठिकाण** :- 20:45 वा. भारतीय नगर कुर्ला(प) मुंबई

**३. आरोपीचे नाव, वय व पत्ता** :- दिपक प्रकाश वैष्णव वय 19 वर्षे भारतीय नगर अलबरकत शाळेसमोर कुर्ला(प)

**४. फिर्यादीचे नाव** :- **वि. भा. नगर पोलीस स्टेशन, मुंबई.**

**५. अहवाल दाखल केल्याची तारीख** :- 20/01/2025

**६. गुन्ह्याचे कलम :- सिगारेट आणि अन्य तंबाखूजन्य उत्पादने प्रतिबंध कायदा, २००३ चे कलम ४, २१ अन्वये.**

याप्रमाणे आरोपीने मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, ५९ वे न्यायालय, कुर्ला, मुंबई यांचे स्थळसिमेतील वि.भा.नगर पोलीस ठाणेच्या हद्दीत सार्वजनिक ठिकाणी आरोपी तंबाखुजन्य सिगारेट ओढताना मिळुन आला म्हणुन आरोपीने **सिगारेट आणि अन्य तंबाखूजन्य उत्पादने प्रतिबंध कायदा, २००३ चे कलम ४, २१** अन्वये गुन्हा केला आहे व तो माझे दखलपात्रेत आहे.

**७. आरोपीचे प्रतिकथन :-**

प्रश्न १ :- तुम्हाला कागदपत्रांच्या नकला मिळाल्या का ?

उत्तर :- होय.

प्रश्न २ :- तुमच्यावर ठेवलेला आरोप तुम्हाला समजला का ?

उत्तर :- होय.

प्रश्न ३ :- तुम्हाला गुन्हा कबुल आहे का ?

उत्तर :- होय.

Dubey

आरोपीची सही

आरोपीतर्फे वकिल/प्रतिनिधी
(Adv. Nageshwar Dubey)

NM

**( एन. एस. काकडे )**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**५९ वे न्यायालय, कुर्ला, मुंबई.**

**ठिकाण : मुंबई.**
**दिनांक :** 13/09/2025

## न्यायनिर्णय

आरोपीविरुध्द प्ली नोंदविण्यात आली. त्याने त्याचे प्रतिनिधी/विधिज्ञ मार्फत गुन्हा कबुल केला आहे. त्या अनुषंगाने आरोपीने गुन्हा कबुलीचा अर्ज दाखल केला व सोबत स्वतःचे ओळखपत्र दाखल केले. आरोपीने गुन्हा कबुल केल्यामुळे त्यास न्यायोचित शिक्षा करणे योग्य होणार आहे. त्यामुळे आरोपी स्वतः किंवा नियुक्त केलेले प्रतिनिधी किंवा विधीज्ञ यांच्यामार्फत दंडाची रक्कम भरण्याची विनंती केलेली आहे. सदर विनंती मान्य करण्यात येत आहे.

आरोपीच्या म्हणण्याप्रमाणे अशा पध्दतीचा त्याच्याविरुध्द दाखल करण्यात आलेला हा पहिलाच गुन्हा आहे. त्यामुळे आरोपीद्वारे त्यास कमीत कमी दंडाची रक्कम भरण्याची शिक्षा व्हावी अशी विनंती केली. आज रोजी लोकअदालत असुन न्यायालयाचा कामकाज दिवस देखील ठेवलेला आहे. त्यामुळे आरोपीने केलेल्या गुन्ह्याचे स्वरुप व त्यास असलेली शिक्षा यांचे अवलोकन केले असता, मी पुढीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. आरोपीस **भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३** चे **कलम २७५** अन्वये **सिगारेट आणि अन्य तंबाखूजन्य उत्पादने प्रतिबंध कायदा, २००३ चे कलम ४, २१** या गुन्ह्यासाठी दोषी ठरविण्यात येत असुन आरोपीस रक्कम **₹ २००/- (अक्षरी रुपये दोनशे फक्त)** दंड भरण्याची शिक्षा करण्यात येत आहे आणि आरोपीने दंड न भरल्यास त्यास **०७** दिवसांची साध्या कारावासाची शिक्षा सुनावण्यात येत आहे.

२. आरोपीस **भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३** चे **कलम ४०४** प्रमाणे न्यायनिर्णयाची प्रत विनामुल्य देण्यात यावी.

**( एन. एस. काकडे )**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**५९वे न्यायालय, कुर्ला, मुंबई.**

**ठिकाण : मुंबई.**
**दिनांक :** 13/09/2025

Paid of Rupees :- 200
Receipt No. :- 2398 24

CASHIER
Addl. C. . M.
Kurla Court, Mumbai